Impact Factor - 6.8
ISSN- 0474-9030

International Multidisciplinary UGC CARE Listed Journal for Research Publication

# OUR HERITAGE

PEER REVIEWED [REFEREED] INDEXED UGC CARE LIST GROUP - B RESEARCH JOURNAL
VOL- 68, ISSUE-35, FEBRUARY -2020:
SPECIAL ISSUE ON MULTIDISCIPLINARY STUDIES



# GENDER EQUALITY AND WOMEN EMPOWERMENT

Chief Editor
**Dr. Ansari Md. Haroon Md. Ramzan**
J.A.T Arts, Science & Commerce College
[For Women], Malegaon, Nashik.

Executive Editor
**Dr. Lodhi Kaniz Fatma Niyaz Ahmad**

Associate Editor
**Dr. Salma Ab. Sattar**

Impact Factor - 6.8

ISSN- 0474-9030

International Multidisciplinary UGC CARE Listed Journal for Research Publication

OUR HERITAGE

PEER REVIEWED [REFEREED] INDEXED

UGC CARE LIST GROUP - B RESEARCH JOURNAL

VOL- 68, ISSUE-35, FEBRUARY -2020:

SPECIAL ISSUE ON MULTIDISCIPLINARY STUDIES

# GENDER EQUALITY AND WOMEN EMPOWERMENT

Chief Editor

Dr. Ansari Md. Haroon Md. Ramzan
J.A.T Arts, Science & Commerce College
[For Women], Malegaon, Nashik.

Executive Editor

Dr. LodhiKanizFatmaNiyaz Ahmad

Associate Editor

Dr. Salma Ab. Sattar

All rights reserved with the Authors and Publishers.

Price: Rs. 700/-

For Details Visit to:https://www.ourheritagejournal.com/

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | राजकीय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग | **डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल**<br>सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग श्री पद्ममणि जैन महाविद्यालय पाबळ | 40-45 |
| 11 | 'संगीत व स्त्री समानता' | **प्रा. अशोक एस. जाधव**<br>सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, संगीत विभाग, एस. पी. एच. महिला महाविद्यालय, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक (महाराष्ट्र) | 46-47 |
| 12 | भारतीय राजकारणातील महिला | **प्रा. अभिलाषा दर्पण शिंदे**<br>सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र)<br>म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगांव कॅम्प ता. मालेगाव नाशिक | 48-51 |
| 13 | लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्प एक विचार प्रवाह | **सुभाष लक्ष्मण अहिरे**<br>सहयोगी प्राध्यापक (इतिहास)<br>के.बी. एच. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय निमगांव ता. मालेगांव जि. नाशिक | 52-54 |
| 14 | महिलांच्या राजकीय सहभागाचा विश्लेषनात्मक अभ्यास | **प्रा. शरद अर्जुन वाघ**<br>राज्यशास्त्र विभाग प्रमुख<br>कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, निमगांव ता. मालेगांव जि. नाशिक | 55-60 |
| 15 | महिला सबलीकरण – राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक भूमिका | **प्रा.डॉ. संभाजी शामराव तनपुरे,**<br>सहाय्यक प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, भेंडे बु.।। त. नेवासा जि. अहमदनगर, | 61-68 |
| 16 | स्त्रीवादी साहित्यातून महिला सबलीकरण | **प्रा. वर्षा योगेश आहिरे**<br>सहा. प्राध्यापक (मराठी) म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प, मालेगांव. | 69-71 |
| 17 | महाराष्ट्रातील विधवा पुनर्विवाह चळवळीचा आढावा | **प्रा. योगेश किरण हिरे**<br>महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, मालेगाव. | 72-75 |

ISSN: 0474-9030
Impact Factor – 6.8

# लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्प एक विचार प्रवाह

**सुभाष लक्ष्मण अहिरे**

सहयोगी प्राध्यापक (इतिहास)

के.बी. एच. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय निमगांव ता. मालेगांव जि. नाशिक

**प्रस्तावना –**

जगामध्ये स्त्री – पुरुष समानता हा सामाजीक प्रश्न आहे. म्हणून आजपर्यंत सामाजीक सुधारणाकडे लक्ष देवून स्त्रि[illegible] पुरुषसत्ताक वर्चस्वातून मुक्त करण्यासाठी चळवळी सुरु आहेत. परंतू सामाजिक समता बरोबरच आर्थिक समता [illegible] महत्वाची विचारधारा आहे. म्हणून लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्प हा नव विचार जगामधून भारताकडे आला आहे. त्याचा थोड[illegible] अभ्यास सुरु आहे.

**उद्देश –**

1) लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्पाची आवश्यकता.

2) स्त्रियांना आर्थिक संधी उपलब्ध करुन देणे.

3) आर्थिक पातळीवर स्त्री – पुरुष समानता प्रस्थपित करणे.

4) लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्पबाबत जनजागृती व प्रशिक्षण

5) स्त्रीयांनी आर्थिक जबाबदारीची माहीती मिळविणे.

6 स्त्रियांना शारीरीक व मानसिक सक्षम करणे.

**लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्पाची आवश्यकता –**

महिलांची शैक्षणिक, व्यावसायीक योग्यता वाढवून त्यांचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. त्यांना आर्थिक संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्यांचा अर्थिक सहयोग वाढवला पाहिजे. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतीक पातळीवर स्त्री – पुरुष समानता प्रस्थापित केली पाहिजे. त्यासाठी जेंडर बजेटींग अर्थात लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्प या नव विचारधारेचा अभ्यास प्रचार व प्रसार केला पाहिजे.

भारतातील स्त्रींयाची लोकसंख्या पुरुषापेक्षा 48 % आहे. अंदाजपत्रकात 6 ते 7 % तरतुद स्त्रीयांसाठी विविध योजनासाठी राबविली आहे. ही टक्केवारी फारच कमी आहे. अर्थसंकल्पात आकडेवारी जामाखर्चाचा ताळेबंद असतो. त्यामध्ये लिंगभावानुसार स्त्रियांचा किंवा पुरुषांचा थेट उल्लेख नसतोच समाजातील सर्व घटकांना समान न्याय व संधी देण्यासाठी आर्थिक तरतुद अर्थसंकल्पात करणे अपेक्षित असते. मुली व महिला यांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिस्थीती लक्षात घेवून धोरणे आखणे गरजेचे आहे. सामाजिक आणि सांस्कृतीक पातळीवर स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या विषमतेचा सामना करण्यासाठी आधिकची आर्थिक संधी मिळावी म्हणुन आर्थिक तरतुद जास्तीत जास्त केली पाहिजे. प्रगत देश म्हणजे ज्यामध्ये देशाच्या एकूण अर्थसंकल्पाच्या किती टक्के रक्कम यासाठी राखुन ठेवला आहे. ज्यामध्ये स्त्रि – पुरुष आर्थिक समान पातळीवर येवू शकतात. याबाबत फारच उदासिनता आहे. याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

**लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्प म्हणजे काय? –**

अर्थशास्त्रात फेमीनिस्ट इकॉनॉमिक्स म्हणजेच स्त्रीवादी अर्थषास्त्र ही संकल्पना रुजु लागली आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेही याची दखल घेतल्यामुळे स्त्री – पुरुष समानतेच्या धोरणाला भक्कम बाजु प्राप्त झाली आहे.


Copyright© 2020

जेंडर बजेट या संकल्पनेचा उदय 90 च्या दशकात झाला. 1995 च्या बिजींगच्या महिला परिषदेनंतर संयुक्त राष्ट्र संघटनेचा महिलांसाठीचा फंड युनिफेम तर्फे दक्षिण अफ्रिका, दक्षिण पूर्व आशिया मध्य अमेरीका अशा भागात लिंगधारीत अर्थसंकल्पावर काम सुरु करण्यात आले.

स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास करणे. त्यामध्ये साकारात्मक बदल करण्यासाठी पैशाची तरतूद, अर्थसंकल्पात त्याची योजना, देशाच्या उत्पन्न व खर्चाचे स्त्री – पुरुष याघटकांवर आधारीत विश्लेषण, स्त्रीया व पुरुषावर बजेटचा होणारा परिणाम मोजणे, आर्थिक तरतूद यातील त्रुटी शोधणे त्यावर उपाय योजना करणे, केलेल्या तरतुदींची अंमलबजाणी झाली की नाही यावर लक्ष ठेवणे, झालेल्या खर्चाचे लेखपरीक्षण करणे, त्याचा अंतिम परिणाम मोजणे म्हणजे लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्प होय. जेंडर बजेट म्हणजे महिलांसाठीचा स्वतंत्र अर्थसंकल्प नव्हे तर अर्थसंकल्पातील विविध प्रस्तावांचे महिला केंद्रित विश्लेषण होय. प्रशासकीय आणि आर्थिक धोरणांच्या साह्याने स्त्री – पुरुष समानता प्रस्थापित करण्याचा हा एक मार्ग आहे. जेंडर बजेट हि संकल्पना सर्वप्रथम आस्ट्रेलियात स्विकारण्यात आली.

**भारतात जेंडर बजेटची सुरुवात –**

भारतात 2001 पासुन जेंडर बजेटचा विचार केला जावू लागला. 2004 मध्ये भारतात केंद्र सरकारने जेंडर बजेट संकल्पना स्विकारली. आजमितास भारताच्या ओडिशा, उत्तर प्रदेश, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, जम्मु कश्मीर, अरुणाचल प्रदेश, छत्तीसगढ, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, बिहार, केरळ, नागालॅड, राजस्थान इ. राज्यांनी जेंडर बजेटच्या बाबतीत अंमलबजावणी सुरु केली आहे.

महाराष्ट्रात 2013 मध्ये जेंडर बजेट ही संकल्पना स्विकारली आहे. महिला व बालकल्याण समिती मार्फत विविध कामे केली जात आहेत.

**अर्थसंकल्पाची कार्यपध्दती –**

लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्पासाठी स्वतंत्र आदेश जारी करणे, जेंडर बजेट सेल स्थापन करणे आणि जेंडर बजेट अहवाल प्रसिध्द करणे. इ. जेंडर बजेटींग सेलचे प्राथमिक कार्य आहे. विविध भागामध्ये धोरणे आखणे तसेच लिंग समभाव या विषयाबाबत जागरुकता निर्माण करणे ही अर्थसंकल्पाची कार्यपध्दती आहे.

**स्थानिक संस्थांचे योगदान –**

जेंडर बजेट बाबत स्थानिक स्वराज्यसंस्था महत्वाची भूमिका पार पाडु शकतात. महापालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये निधी महिला व बालकल्याण समितीकडे वर्ग केला जातो. या निधीतुन बालक सक्षमीकरणासाठी योजना राबविल्या जातात. स्थानिक स्वराज्य संस्थांना जेंडर बजेट तयार करण्याचे सांगण्यात आले आहे. एकूण अर्थसंकल्पाच्या पाच टक्के रक्कम "जेंडर बजेट" साठी राखुन ठेवण्याचे बंधन महापालिकावर आहे. स्त्रियांचे सक्षमीकरण, स्त्रियांचे आरोग्य आणि स्त्रियांचे सरंक्षण हे तीन मुख्य विषय समोर ठेवून स्त्रिकेंद्री अर्थसंकल्पनाची कल्पना पूढे आली आहे. स्त्रियांना प्रसाधनगृहे, पाण्याची उपलब्धता, महिला सुरक्षारक्षकाची नेमणूक, स्वच्छता कर्मचाऱ्याची नेमणूक, महिला बचत गटाचे सक्षमीकरण, बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी यासाठी कायमस्वरुपी जागा, स्त्रियांना स्वंरक्षणाचे धडे, अद्यावत व्यायामशाळा, योगा सभागृह, अभ्यासिका, स्त्रियांसाठी स्वतंत्र जॉगिंग ट्रॅक, दारीद्र्य रेषेखालील महिलांना विविध प्रकारचे व्यवसाय प्रशिक्षण, पाळणाघरे, आरोग्य शिबीरे, महिला व बालकांसाठी स्वतंत्र वाचनालय, ग्रंथालय, सांस्कृतिक सभागृह इ. स्त्रीकेंद्रीत कामे या जेंडर बजेटच्या माध्यमातून प्रभावीकपणे करणे आवश्यक आहे.

**जेंडर बजेट बाबत जनगागृती व प्रशिक्षण –**


Copyright© 2020